प्रकरण ५ वे

# औसा तालुका सर्वांगीण माहिती

प्रकरण ५ वे.

## औसा तालुक्याची सर्वांगीण माहिती.

५. १ भौगोलिक स्थिती.

५. २ ऐतिहासिक महत्त्व.

५. ३ लोकसंख्या.

५. ४ आर्थिक स्थिती.

५. ५ सामाजिक स्थिती.

५. ६ सांस्कृतिक स्थिती.

५. ७ शैक्षणिक प्रगती.

-: प्रकरण ५ वे. :-

## औसा तालुका सर्वांगीण माहिती :-

औसा तालुका पूर्वीच्या उस्मानाबाद व सध्या नव्याने निर्माण झालेल्या लातूर जिल्हयाचा एक तालुका होय. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक आर. इ. आर/४३८१/४५६७/९८७/एनु./१० दिनांक. १३-८-१९८२ नुसार उस्मानाबाद व बीड या जिल्हयाचे विभाजन होउन दिनांक क १६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर व जालना जिल्हा[1] अस्तित्वात आला.

लातूर जिल्हयात, औसा, लातूर, निलंगा, अहमदपूर आणि उदगीर असे पांच तालुके आहेत. या पैकी औसा हा तालुका खूपच मागासलेला आहे. मराठवाडयातील या अत्यंत अविकसित अशा "औसा तालुक्यातील राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांच्या केंद्राचा चिकित्सक अभ्यास" हा विषय अभ्यासकाने शोध प्रबंधासाठी ( एम्.फील्) निवडलेला आहे. या प्रकरणात औसा तालुक्यातील भौगोलिक, ऐतिहासिक, लोसंख्या, आर्थिक , सामाजीक व सांस्कृतिक शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास सविस्तरपणे अभ्यासकाने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### भौगोलिक स्थिती -

१६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर जिल्हा अस्तित्वात आला. या जिल्हयात, पांच तहसिल क्षेत्र हे उस्मानाबाद जिल्हा आणि ४३ गांवे व ११ वाडया अंबाजोगाई तालुका, जिल्हा बीड यांचा समावेश आहे.

लातूर जिल्हा क्षेत्रफळ ७३०४चौ. कि.मी. आहे समुद्रसपाटी-- पासूनची उंची ५४० ते ६३८ मिटर आहे. या जिल्हयात मांजरा, तेरणा, मन्याड, लेंडी, धरणी, आणि तावरजा अशया ६ नदया व उपनधा आहेत.[2]

लातूर जिल्हयाच्या पश्चिमेला आणि दक्षिणेला उस्मानाबाद जिल्हा वायव्य दिशेला बीड जिल्हा ईशान्य दिशेला नांदेड जिल्हा, उत्तर दिशेला परभणी आग्नेय दिशेला बीदर जिल्हा कर्नाटक राज्य अशा सरहद्दी आहेत.

हा जिल्हा १८.०५$^0$ ते १८.७५$^0$ उत्तर अक्षांश व ७६.२५$^0$ ते ७७.२५$^0$ पूर्व रेखांशामध्यें वसलेला आहे.[२]

या जिल्हयाचे कमाल तपमान २९.५ डिग्री अंश सेल्सीअस आणि किमान १५.० अंश सेल्सीअस. असते.[३]

या जिल्हयातील जमीनिचा कांही भाग हलक्या प्रतिचा आहे. त्यामुळे खरिप पिके घेतली जातात. लातूर, निलंगा, औसा, तालुक्यातील कांही जमिनी चांगल्या प्रतिच्या असून या भागात प्रामुख्याने रब्बी पिके घेतली जातात. लातूर या जिल्हयाच्या ठिकाणापासून दक्षिणेकडे औसा शहर २१ कि.मी. लांब आहे.

औसा तालुका :-

बालाघाट पर्वतानी व्यापलेला आणि तावरजा व तेरणा व या नद्याच्या सरहद्दी लाभलेला हा औसा तालुका होय. औसा तालुक्याच्या दक्षिण व पश्चिमेला उस्मानाबाद जिल्हा. पूर्वेला निलंगा तालुका आहे. उत्तर दिशेला तावरजा आणि दक्षिणाकडे तेरणा नदी, अशा या तालुक्याच्या श सरहद्दी आहेत.

औसा तालुका :-

× १८.$^0$१२ उत्तर अक्षांश आणि
१७$^0$.३० पूर्व रेखांश वर वसलेला आहे.[४]

समुद्र सपाटी पासून.
उंची. × ६३५ मिटर आहे.

तपमान - कमाल. × ४७.८ सेल्सी अंश.

किमान. ३०.८ सेल्सी अंश.

वार्षिक सरासरी.

पर्जन्यमान. × ४९०. एम्. एम्.

हवामान. × सामान्यपणे कोरडे आणि उष्ण
वर्षभरात प्रामुख्याने नैऋत्यद्वारे वाहतात.
आक्टो-डिसे. मध्यें ईशान्य वारे वाहतात.

ऐतिहासिक :-

लातूर जिल्हा याला एक ऐतिहासिक महत्व आहे. लातूरचे जुने नांव " रत्नापूर " होते. या नावाचा उल्लेख जैमिनी अश्वमेधातील ताम्रध्वज व मकरध्वज यांची वैभवशाली राजधानी होय.[५] असा उल्लेख आहे.

राष्ट्रकुट घराण्याचे राज्य लातूर येथे होते. पूर्वीचे नांव रत्नापूर, नंतर " लातूर" असे पडले कालांतराने येथे निजाम राजवट आली हा भाग हैद्राबाद संस्थानामध्यें होता. १३ सप्टेंबर १९४८ रोजी पोलिस अॅक्शन नंतर स्वतंत्र भारतात हैद्राबाद संस्थान सामील झाले.[६] या लातूर जिल्हयामध्यें उदगीर व औसा येथे भुईकोट किल्ला आहे. लातूर येथील सिध्देश्वर मंदीर व निलंगा येथील निळकंठेश्वर मंदिर याचे बांधकाम हेमाड पंथी आहे. शिवाय खरोसा येथे बौध्द कालीन लेण्या आहेत.[७]

औसा शहर साधारणतः बाराशे वर्षापूर्वी वसलेले आहे. चालुक्य राजा विजयादीत्य याच्या बोरगांव ताम्रपटात औध्याची प्रथम नोंद झाली . उच्चेत्सवा( Uchchei Sava ) औसा ४० अशी नोंद आहे.[८]

यादव कालीन शिलालेखापासून याची नोंद देशाचे प्रशासकीय विभागाचे प्रमुख केंद्र म्हणून दिसते.

## भुईकोट किल्ला :-

औसा येथे बहामनी कालीन भुईकोट किल्ला आहे. इ.स. १२९४ मध्यें विजापूरच्या आदिलशाहाने हा किल्ला बांधला. या किल्याचे एकूण क्षेत्र २४ एकर २० गुंठे आहे. अहमदनगरचा निजाम शाही वंशाचा मुर्तीजाअल्ली यांच्या संरक्षणासाठी, छत्रपती शिवाजी महाराज यांचे पिताजी शहाजीराजे यांनी औसा व परंडा येथील किल्याचा उपयोग केला. शेवटी मोगलांनी औश्याचा किल्ला १९ ऑक्टोबर १६३६ मध्यें जिकूंन घेतला.[९]

इ.स. १६७० मध्यें छत्रपती शिवाजी राजे यांनी मोगल प्रदेशात हलकल्लोळ उडविला होता. महाराजाचे सैन्य औसा, उदगीर, विभागात स्वैर संचार करू लागले.

औरंगजेबच्या मृत्यू नंतर निजाम उलमुल्क याच्या हातात येथील प्रदेश आला. निजाम १७२४ मध्यें स्वतंत्र झाला.

सन १८५३ मध्यें इंग्रज शासनाने हा प्रदेश गहाण म्हणून निजाम कडून घेतला होता इंग्रज कर्नल मेंडीज टेलर हा या भागाचा प्रमुख होता. नंतर पुढे १८६१ मध्यें हा प्रदेश पुन: निजामाकडे आला.[१०]

असा हा भुईकोट किल्ला असून, विविध राजवटी पाहिलेला या किल्याच्या सभोवताली प्रचंड खंदक, आहे. किल्ल्यात अजस्त्र तोफा, घोडदलासाठी पागा, धान्याची कोठारे, भुयारी पाणी महल, विहिरी आहेत.

औसा हे ऐतिहासिक नगर असल्यामुळे जुन्या काळातील वास्तुचे अवशेष म्हणजे- घुमटाकार इमारती, अष्टकोनी, चौकोनी विहिर, सतीचा कट्टा, सासू-सुना विहिर, नंगे बुवा यांची भुयारी समाधी गावाच्या भोवती उध्वस्त झालेला तट आणि सध्या शाबूत असलेली निलंगा वेस इत्यादी आजही दिसतात.

खरोसा लेणी :-

औसा तालुक्यातील खरोसा येथे पूर्वे कडील डोंगरात इ.स. ६ व्या शतकातील लेणी खोदलेल्या आहेत. या लेण्या बौध्द कालीन असाव्यात शिवाय शिल्पकाराला येथील दगड ठिसूळ आढळल्याने हे सर्व लोक पुढे अजिंठा वेरुळ कडे गेले असावेत असे म्हटले जाते. शिवाय किल्लारी येथील निळकंठेश्वराचे मंदीर, देवताळा येथील देवीचे मंदीर, टाका, उजनी, रिंगनी, हत्तेगांववाडी, येथील धार्मिक मंदीरे इतिहास प्रसिध्द आहेत.

लोकसंख्या :-

औसा शहराचे क्षेत्रफळ ३८.६ चौ. कि.मी. व ग्रामीण भागाचे क्षेत्रफळ १,१७३० चौ. कि.मी आहे या तालुक्याची आज पर्यन्तची लोकसंख्या खालील प्रमाणे देण्यांत आलेली आहे.

-:: कोष्टक क्रमांक ::- १.

लातूर जिल्हा - लोकसंख्या १९५१ ते १९८१.

| अ.क्र. | वर्षे | एकूण लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | शहरी लोकसंख्या | एकूण लोकसंख्येशी टक्केवारी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १९५१ | ६,६४,००० | ५,७९,००० | ८७.२० | ८५००० | १२.८० |
| २) | १९६१ | ८,१८,००० | ७,३१,००० | ८९.३६ | ८७००० | १०.६४ |
| ३) | १९७१ | १०,४८,००० | ९,१०,००० | ८६.९३ | १३८००० | १३.१७ |
| ४) | १९८१ | १२,९३,८४२ | १०,८०,७९३ | ८३.५४ | २१३०४९ | १६.४६ |

संदर्भ :- जिल्हा सांख्यिकिय कार्यालय लातूर.[११]

लातूर जिल्हयातील लोकसंख्या इ.स. १९५१ पेक्षा १९८१ मध्यें जवळ जवळ दुप्पट झालेली दिसते. ग्रामीण व शहरी लोकसंख्या एकूण लोकसंख्याच्या ८७.२० टक्के होती तरी १९८१ मध्यें हे प्रमाण कमी होऊन ८३.५४ झाल्याचे दिसते.

-: कोष्टक क्रमांक -२:-

औसा तालुका - लोकसंख्या १९५१ ते १९८१.

| अ.क्र. | वर्षे | एकूण लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | एकूण ग्रामीण लोकसंख्या टक्केवारी | शहरी लोकसंख्या | शहरी लोकसंख्येशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १९५१ | ९८००० | ९०,००० | ९१.८३ | ८००० | ८.१७ |
| २) | १९६१ | १,२२,८१६ | १,१२,८०९ | ९२.०० | १०००७ | ८.०० |
| ३) | १९७१ | १,५५,६०८ | १,४२,१३१ | ९१.३३ | १३४७७ | ८.६७ |
| ४) | १९८१ | १,८२,०७० | १,६५,२९४ | ९०.७८ | १६७७६ | ९.२२ |

उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका.[१२]

लातूर जिल्हयातील औसा तालुक्यात ग्रामीण लोकसंखेचे प्रमाण जास्त आहे. इ.स. १९५१ मध्यें एकूण लोकसंख्येच्या ९१.८३ ٪ लोकसंख्या ग्रामीण भागात होती. तर इ.स. १९८१ मध्यें हे प्रमाण ९०.७८ दिसते. या तीस वर्षाच्या काळात ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात फक्त १.०५٪ घट झाल्याचे दिसते.

-: कोष्टक क्रमांक - ३ - :-

**औसा तालुका स्त्री - पुरुष लोकसंख्या.**

| अ. क्र. | वर्ष. | ग्रामीण. | | शहरी. | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री. | पुरुष | स्त्री. | पुरुष. |
| १) | १९५१ | उपलब्ध | नाही. | उपलब्ध | नाही. |
| २) | १९६१ | ५४,८२९ | ५७,९८० | ४,९१९ | ५,०८८ |
| ३) | १९७१ | ६९,२५५ | ७२,८७६ | ६,५०३ | ६,०७४ |
| ४) | १९८१ | ८१,२३० | ८४,०६४ | ८,०७८ | ८,६७८ |

संदर्भ :- उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्तपुस्तिका.[१३]
१९६६,७१.८१

औसा तालुक्यात स्त्रियापेक्षा पुरुषाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. १९६१ मध्यें औसा तालुक्यातील ग्रामीण भागात दर १००० ( हजारी ) पुरुषा मागे ९४५ स्त्रियाचे प्रमाण आहे. तर १९८१ मध्यें ग्रामीण भागात हे प्रमाण ९६६ इतके झालेले आहे. शहरी भागात मात्र हे प्रमाण १९६१ मध्यें दर १०००( हजारी ) पुरुषा मागे ९६६ स्त्रिया, तर १९८१ मध्यें हे प्रमाण ९३० झाल्याचे दिसते. या वरुन ग्रामीण भागात स्त्रियाचे प्रमाण वाढलेले दिसते तर शहरी भागात कमी झालेले दिसते.

-: कोष्टक क्रमांक ४ :-

औसा तालुका साक्षरतेचे प्रमाण ( शहर विभाग )

| अ. क्र. : | वर्षे | एकूण साक्षर पुरूष | एकूण पुरूष लोकसंख्येशी साक्षरतेचे प्रमाण. | एकूण साक्षर स्त्रिया | एकूण स्त्री लोकसंख्येशी साक्षरतेचे प्रमाण. | एकूण लोकसंख्येशी साक्षरतेचे प्रमाण. |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १९५१ | १४९६ | ३७. २२ | ३८५ | १०. १९ | २४. १२ |
| २) | १९६१ | २२११ | ४३. ४५ | ७३३ | १४. ९० | २९. ४१ |
| ३) | १९७१ | ३२६९ | ४६. ८७ | १७१२ | २६. ३२ | ३७. ०३ |
| ४) | १९८१ | ५०१८ | ५७. ८२ | २६२९ | ३२. ५३ | ५५. ५० |

संदर्भ :- उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका.[१४] १९६६-१९७३. – १९८१.

औसा शहरात १९५१ मध्यें साक्षरतेचे प्रमाण एकूण लोकसंख्येशी २४. १२ एवढे असल्याचे दिसते. त्याच प्रमाणे एकूण पुरुष संखेपैकी, साक्षर पुरूषाचे प्रमाण ३७. ३२ ٪ एवढे दिसते.

एकूण स्त्री लोकसख्येशी १०. १९ ٪ एवढया स्त्रिया साक्षर आढळतात. १९५१ नंतर मात्र स्त्री आणि पुरूष साक्षरतेचे प्रमाण सतत वाढत गेल्याचे दिसते.

१९८१ च्या जनगणना अहवालानुसार औसा शहरातील साक्षरतेचे प्रमाण एकूण लोकसंख्येशी ५५. ५ ٪ एवढे झाल्याचे आढळते. यात ५७. ९२ ٪ पुरूष साक्षर आणि ३३. ५३ ٪ स्त्री साक्षर दिसतात. विशेषत: स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरूष साक्षरते प्रमाणे वाढल्याचे दिसून येते. शहरात पुरूषा पेक्षा स्त्रिया जास्त निरक्षर आहेत असे दिसते.

-: कोष्टक क्रमांक ५ :-

औसा तालुका साक्षरतेचे प्रमाण( ग्रामीण भाग )

| अ.क्र. | वर्ष | एकूण साक्षर व्यक्ती | एकूण साक्षर पुरुष | एकूण साक्षर स्त्रिया. | एकूण लोकसंख्येशी चे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९५१ | उपलब्ध | नाही. | उपलब्ध | नाही. |
| २) | १९६१ | १६,१७० | १३,७६८ | २४०२ | १४.३३% |
| ३) | १९७१ | ३२,९४९ | २५,३३७ | ७६१२ | २८.१८ % |
| ४) | १९८१ | ५१,३२८ | ३६.९७७ | १४३५१ | ३१.०५% |

संदर्भ :- औसा /उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्तपुस्तिका.[१५]

साक्षरतेच्या प्रमाणा मध्यें महाराष्ट्राचा देशामध्यें दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात एकूण ४७.३७% लोक साक्षर आहेत. लातूर जिल्हया मध्यें एकूण ४,२५,८५० व्यक्ती इ.स.१९८१ मध्यें साक्षर होत्या त्यामध्यें पुरुष ३,०२०,३७ आणि स्त्रिया १,२३,८१३ एवढे साक्षर होते.

औसा तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रमाण इ.स.१९६१ मध्यें १४.३३ होते तर इ.स. १९८१ मध्यें ३१.०५ % एवढे दिसून येते.

इ.स.१९८१ च्या जनगनना अहवाला नुसार औसा तालुक्यातील ग्रामीण भागात ६८.९५% जनता निरक्षर आहे. त्यात स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. असे दिसून येते.

औसा शहरातील लोकसंख्येचे वर्गीकरण :-

अ) लोकसंख्या :-

| १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ |
|---|---|---|---|---|
| ७५०४ | ७७९६ | १०००७ | १३४७७ | १६७६१ |

ब) दहा वार्षिक फरक:- शेकडा प्रमाण %

| १९४७-५१ | १९५१-६१ | १९६१-७१ | १९७१-८१ |
|---|---|---|---|
| ३.८९ | २८.३६ | ३४.६८ | २४.६७ |

क) स्त्री पुरुष प्रमाण १००० पुरुषा बरोबर स्त्रियाचे प्रमाण.

| | साल. | स्त्री. |
|---|---|---|
| १. | १९७१ | ९३२ |
| २. | १९८१ | ९३२ |

ड) व्यावसायीक वर्गीकरण १९८१.

| अ.नं. | वर्गवारी | कामगार पुरुष. | कामगार स्त्री. | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | मशागत करणारे | ७४३ | ५३ | १५.१८ % |
| २. | शेतकरी मजूर | ११९९ | ७१९ | ३६.५७ % |
| ३. | घरगुती उद्योगधंदे / कारखाने व इतर व्यावसायिक | १०३ | ५१ | २.९३ % |
| ४. | इतर कामगार /व्यवसायिक | २०२८ | २५४ | ४३.५१ % |
| | एकूण. | ४०७३ | १०७७ | ९८.१९ |
| ५. | मार्जिनल कामगार | २३ | ७२ | १.८१ |
| ६. | एकूण ५ +६ अ.नं. | ४०९६ | ११४९ | १००.००% |

इ) अपंग/दुबळे. १) पूर्णपणे अंध व्यक्ती १०.२) पूर्णपणे अपंग ९.

ई) साक्षरता :-

| अ. नं. | साल. | शे. पुरुष. | शे. स्त्री. | एकूण. |
|---|---|---|---|---|
| १. | १९७१ | ४६.८७% | २६.३३ % | ३६.९६ |
| २. | १९८१ | ५८.०५% | ३२.२४ % | ४५.६५ |

लोकसंख्येची घनता:- १९७१ जनगनना प्रमाणे. ३५ व्यक्ति प्रत्येकी एक हेक्टर.

१९८१ जनगनना प्रमाणे ४३ व्यक्ति प्रत्येकी. एक हेक्टरला.[१६]

औसा ही एक नगर पालिका आहे. १९५४ च्या कायधानुसार नगरपालिका स्थापन झाली. या पालिकेला " पूर पालिका- सईदाद कमिटी" - म्हणून हैद्रबाद राज्यात पांच हजाराच्या वर लोकसंख्या आणि वीस हजारा पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावाला पालिका असत. या पालिका "क" वर्गापेक्षा कमी दर्जाच्या व तालुक्याच्या ठिकाणी असलेला असत. या पालिकेला उर्दू मध्यें " मजा-लिसे बलदीया और कसबा: म्हणत."क" वर्ग नगर पालिके पेक्षा दर्जा कमी म्हणून "पूर" असा शब्द आला. जिल्हयाच्या ठिकाणी असलेल्या नगर पालिकांना "बल्दीया" आणि तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या पालिकांना " पूर"म्हणात. १९६५ च्या कायधानूसार " औसा नगर परिषद " "क" वर्ग नगर परिषद असे नांव मिळाले. १६ जुलै १९६७ मध्यें निर्वाचित नगर पालिका अस्तित्वात आली सध्या नगरपालिकेत २० निर्वाचित सदस्य दोन स्विकृत सदस्य अशी बावीस सदस्य संख्या आहे.

औसा तालुक्यात १२९ गावे १६ वाडया आणि ९० ग्राम पंचायती आहेत. ६ प्राथमिक आरोग्य केंद्र २ प्राथमिक आरोग्य पथक, ४२ आरोग्य उपकेंद्र एक आयूर्वेदिक दवाखाना, अशी जिल्हा परिषद लातूर मार्फत चालविली जातात. शिवाय खाजगी व्यवसाय करणारे तज्ञ डॉक्टर्स यांचे दवाखानेही आहेत.

आर्थिक स्थिती :-

औसा तालुक्यातील प्रमुख व्यवसाय कृषी व पशूपालन हा आहे. शेतीला जोडून पशूपालन हा व्यवसाय चालतो. बहुसंख्य लोक मजूरी करतात. खरीप हंगाम आणि रब्बी हंगामी पीके घेतली जातात. किल्लारी येथे एक सहकारी साखर कारखाना आहे. ज्वारी, गहू, भुईमुग, सूर्यफूल ऊस, इत्यादी पिके घेतली जातात.

उद्योगधंदे :-

औसा शहर जिल्हया पासून फक्त २१ कि. मी. अंतरावर असल्यामुळे येथे औद्योगिक विकास होवू शकला नाही. ऐतिहासिक काळात येथे असलेल्या गुरु बागेत मोती, पवळे, हिरे, माणिक इत्यादी रत्नांच्या व्यापार चालत होता असे वृध्द लोक सांगतात.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात येथे श्री उटगे व श्री. हालकुडे यांचा रंगाचा कारखाना होता. हा सर्व रंग वनस्पती पासून तयार करित असत.

खादी उत्पादन केंद्र :-

हैद्राबाद खादी समितीच्या वतीने औसा खादी उत्पादन केंद्राची स्थापना इ.स. १९५५ मध्ये झाली. पुढे अखिल भारतीय खादी ग्रामोधोग कमिशनच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणा प्रमाणे १ मे १९६७ पासून हैद्राबाद खादी समितीने मराठवाडयातील खादी ग्रामोधोगाचे कार्य दि १ जून १९६७ पासून खादी ग्रामोधोग समितीस हस्तांतरित करुन दिले. येथे खादीचे सर्व प्रकारचे उत्पादन होते. मोठी "दोन सुती महिन् एक सुती महिन् "महिन् धोती, धादर, टावेल बेडशीट," इत्यादीचे उत्पादन होते. तसेच १९८५ पासून खादी पॉलिस्टरचे ही उत्पादन सुरु आहे.

कागद केंद्र :-

खादी उत्पादन केंद्राच्या परिसरातच हा कागद केंद्राचा प्रकल्प आहे. माजी अर्थमंत्री माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते २ ऑक्टो. १९६० रोजी हा प्रकल्प सुरु झाला. येथे चित्रकला कागद, लिहिण्याचा पातळ कागद, इत्यादी प्रकारच्या कागदाचे उत्पादन होते.

इ.स. १९७२ दिल्ली येथे आशिया खंडातील खादी व कागद उत्पादनाचे प्रदर्शन भरले होते. त्यात येथील खादी व कागद प्रकल्प सहभागी होते.

औसा येथे तयार झालेला कागद आशिया, आफ्रीका, ऑस्ट्रेलिया, संयुक्त अमेरिका, कॅनडा येथे निर्यात होतो.

या दोन केंद्रात मिळून ४३० +-१००= ५३० मजूर स्त्रिया व पुरुष यांना रोजगार प्राप्त झालेला आहे.[१७]

आर्थिक दृष्टया हा तालुका इतर तालुक्याच्या मानाने मागासलेला आहे. शेतकरी आणि शेतमजूर रोजनुदारीने काम करणारा वर्ग, लहान मोठा व्यापार येथे आहे. परंतु उत्पादन करण्याचे कोणतेही साधन, उद्योगधंदे येथे जवळपास नाहीत. त्यामुळे तालुकाच आर्थिक बाबतीत मागासलेला आहे.

सामाजिक स्थिती :-

औसा तालुक्यातील समाज व्यवस्थे मध्यें चार वर्ण ब्राम्हण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र हे प्राचीन काळापासून आलेले आहेत. शिवाय सर्व जाती जमाती आणि मुस्लीम धर्माचे लोक येथे वास्तव्य करुन आहेत. तुरळकपणे कांही ठिकाणी नवबौध्द आणि ख्रिश्चन या धर्माचे ही लोक वास्तव्य करुन राहतात.

एकत्र कुटूंब पध्दती आणि विभक्त कुटूंब पध्दती येथे असून

पुरुष व्यक्ती, कुटूंब प्रधान आहेत. येथील व्यवसाय प्रामुख्याने शेती आणि पशुपालन हा आहे. जमीनदार शेतकरी संख्येने कमी असून शेतमजूर मोलमजूरी करणारे यांची संख्या जास्त आहे. बारा बलुतदार व्यवस्था रुढ आहे. हिंदू मुस्लीम धर्म पध्दती प्रमाणा विवाह पध्दती प्रचलीत आहेत. शेती, अल्प प्रमाणात गृह उद्योग , हस्त व्यवसाय येथील समाजात दिसून येतात.

येथे पांढरपेशा वर्ग मोठया प्रमाणात आहे. राहणीमान उच्च दर्जाचे, मध्यम दर्जाचे आहे. सुखासीनवृत्ती पेक्ष श्रम प्रवृत्ती येथे जास्त प्रमाणात दिसून येते.

सांस्कृतीक महत्व :-

प्राचीन काळातील जैन मुनी " कनकामर" यांचे वास्तव्य होते. औसा येथे महानुभाव पंथाचे पीठ, नाथ संप्रादाय, लिंगायत संप्रादाय मुस्लीम धर्मातील शिया व सुनी यांचीही धार्मिक स्थळे आहेत. मल्लीनाथ महाराजाचे मंदीर, श्रीराम मंदिर, जैन मंदिर, गावाच्या भोवताली असलेली सात हनुमान मंदिरे, चार दिशेला असलेले मुसलमानाचे पीर, औरंगजेबाने सहाय्य केलेली ( जुम्मा मजिद) हया सर्व वास्तु सर्वधर्म समभाव यांचेच प्रतिक आहेत. प्राचीन भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा या शहराने जतन करुन ठेवलेला आहे.

शैक्षणिक प्रगती :-

शिक्षणाच्या बाबतीत औसा तालुका अत्यंत मागासलेला आहे. निजाम राजवटी मध्येंं औसा तालुका जुन्या उस्मानाबाद जिल्हयात आणि मराठवाडा विभागात मोडत असे " मराठवाडा" हा शब्द निजाम राजवटी पासून रुढ आहे. इ.स. १९२१ च्या खानेसुमारी प्रमाणे निझाम सरकारने हैद्राबाद राज्याचे दोन विभाग केले होते. त्यात तेलगू भाषा बोलणारे यांच्या विभागाला तेलंगणा तर मराठीभाषा

बोलणारे त्यांना महाराष्ट्र- मराठवाडी असे विभागाचे नांवे होती. यात पूर्वीचे आठ जिल्हे समाविष्ट होते. त्यात औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड, आणि उस्मानाबाद व गुलबर्गा, रायचूर, बीदर यांचा समावेश होता. सप्टेंबर १९४८ या दिवशी लष्करी कारवाई होवून हैद्रबाद राज्यासह वरील आठ जिल्हे भारत सरकारच्या ताब्यात आले. विलीनीकरण झाले. विलीनीकरणानंतर मराठवाडी विभागातील पाच जिल्हे, औरंगाबाद, नांदेड परभणी, बीड, उस्मानाबाद हे महाराष्ट्रात सामील झाले तर गुलबर्गा, रायचूर बीदर हे जिल्हे कर्नाटक राज्यात समाविष्ट झाले महाराष्ट्रातील जुन्या हैद्राबाद राज्यातील पाच जिल्हयाना मराठवाडा हे नांव रुढ झाले.[१८] औरंगाबाद या विभागीय केंद्राच्या ठिकाणी "मराठवाडा विद्यापीठ" औरंगाबाद येथे अस्तित्वात आहे. अशा "मराठवाडा" विभागातील शैक्षणिक प्रगती पाहताना अभ्यासकाला असे आढळून आले की, जुन्या हैद्राबाद राज्याच्या जन संख्येला धरून पाहिले तर हजारी ३३ लोकांना लिहिता वाचता येत होते. तत्तकालीन ब्रिटीश हिंदुस्थानातील इतर प्रांताशी तुलना केली तर या हैद्राबाद राज्याचा नंबर सर्वांच्या खाली लागतो. यात मराठवाडयात लिहिता वाचता येणा-यांची संख्या हजारा मागे २४ व्यक्ती आढळतात.

स्त्रियांच्या बाबतीत पाहिले असता साक्षर स्त्रियांची संख्या तेलंगनात हजारात ५ होती ती हजारात १३ पर्यंत वाढली. मराठवाडयात साक्षर स्त्रियांची संख्या हजारात १ पासून हजारात ४ पर्यंत वाढलेली दिसते. शैक्षणिक प्रगतीच्या बाबतीत हैद्रबाद राज्यातील तेलंगना आणि महाराष्ट्र मराठवाडा यातील हा फरक प्रामुख्याने जाणवतो. लोक शिक्षणाची तरतूद येथे योग्य रितीने झालेली नव्हती.

फसली १३३४ म्हणजे इ.स. १९२४ मध्ये हैद्राबाद संस्थानात मुलींच्यासाठी यांच माध्यमिक हायस्कूल, १५ उच्च प्राथमिक विद्यालये, ६६२ प्राथमिक शाळा होत्या. मुलींच्या तीन माध्यमिक शाळांना सरकारकडून मदत मिळत नव्हती आणि लोकफंडा कडूनही मिळत नाही.. मुलींच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा फक्त ६-च चालविल्या जात होत्या.

हैद्राबाद संस्थानामध्ये फसली १३३४ म्हणजे इ.स.१९२४ मध्ये फक्त औरंगाबाद येथे एक पुरुषाचे ट्रेनिंग स्कूल, एक स्त्रियाचे ट्रेनिंग स्कूल, एक औद्योगिक शाळा अशी स्थिती होती.[१९]

याशिवाय सामान्य जनतेला उपयोगी पडणा-या वाचनालयाना निजाम सरकार कडून कसलीही मदत मिळत नव्हती. उलट अडचणी उत्पन्न करण्यात येत होत्या. शिकविण्याचे माध्यम मराठी आणि उर्दू असले तरी उर्दूला जास्त प्राधान्य होते. [२०]

फसली १३५६/५७ मध्ये म्हणजे इसवी सन १३ सप्टेंबर १९४८ या रोजी "हैद्राबाद राज्य" पोलिस ॲक्शन नंतर भारतात विलीन करण्यात आले. फसली ही कालगणना निजाम सरकारने हैद्राबाद राज्यात रुढ केलेली होती. इसवीसन आणि फसली यामध्ये ५९० वर्षाचा फरक आहे. विलीनीकरणानंतर हैद्राबाद राज्यातील पांच जिल्हे, औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद हे महाराष्ट्रात सामील करुन घेण्यात आले आणि हे जिल्हे "मराठवाडा" या प्रचलित नांवाने ओळखले जातात. यातील बीड आणि उस्मानाबाद या दोन मोठया जिल्हयाचे विभाजन होऊन, १६ ऑगस्ट १९८२ रोजी "जालना आणि लातूर" असे दोन नवे जिल्हे निर्माण झाले या प्रकारे मराठवाडयातील एकूण जिल्हयांची संख्या सात झालेली आहे.

इ.स. १९५१ पर्यन्त येथे उर्दू माध्यमातून शिक्षणाची शेवटची शाखा होती. स्वतंत्र मुलींच्या शाळा मधून १९५0 पर्यन्त उर्दू माध्यम होते. या शाळांची नावे -

१) मदरसे तहतानिया- पूर्व प्राथमिक शाळा २) मदरसे - नितवानिया - -प्राथमिक शाळा ३) मदरसे फ़ोकनिया- माध्यमिक शाळा अशी होती.[२१] इ.स. १९५१ मध्ये औसा तहसिल निर्माण झाले. प.पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी "रावा हिप्परगा" येथे राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा सुरु केली या शाळेतील विधार्थी आजही हयात आहेत. या तालुक्यात उजनी येथे खाजगी संस्थेचे गणेश विद्यालय हयाचे रुपांतर माध्यमिक विधालया मध्ये झाले. पुढे औसा येथे श्री.मुक्तेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाने श्री.मुक्तेश्वर माध्यामिक शाळा औसा येथे सुरु केली. इ.स. १९६२ साली जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यानंतर प्राथमिक व माध्यमिक शाळा जिल्हया परिषद शिक्षण खात्याकडे वर्ग करण्यांत आल्या. यावेळी जिल्हा परिषद आणि खाजगी संस्था यांच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा होत्या. सध्या आहेत. जिल्हा परिषद प्रशाला या माध्यमिक शाळेची पहिली एस.एस.सी. ची तुकडी इ.स. १९५२ मध्ये बाहेर पडली. इ.स. १९५२ ते १९८९ म्हणजे ३७ वर्षात एकंदर ६ विधार्थी गुणवत्ता यादीत आले. यातील एक विधार्थीनी आहे यांची काही नावे कुमार अशोक शिवलिंगअप्पा कवळास एस.एस सी.गुणवत्ता यादीत आणि १२ वी बोर्ड परिक्षेत विभागात पहीला आला. कु.किनीकर, मुक्तेश्वर हायस्कूल हा गुणवत्ता यादीत होता. सहा पैकी एक विधार्थीना कुमारी मीरा चिंचोलीकर ही गुणवत्ता यादीत आली. मुलींच्या कन्या शाळेची सुरवात प्राथमिक वर्गा पासून झाली १९६२ पासून माध्यमिक वर्ग सुरु झाले या प्रकारे मराठवाडयातील औसा तालुका येथील शिक्षणाला बदलते स्वरुप येवू लागले. तरीही स्त्रियांच्या शिक्षणाबाबत हा भाग मागासलेला असाच आहे. "मुलीना शिकवून काय करायचे?" हा विचार आम जनतेच्या मनावर रुजलेला आजही दिसतो आहे.

औसा तालुक्यातील ग्रामीण भागातील साक्षरता प्रमाण १९८१ मध्ये शेकडा ३१.०५ एवढे दिसते. [२२] शहरातील साक्षरता शेकडा ५५.२५ [२३] एवढी आढळते. शहर आणि ग्रामीण भागात पुरुषा पेक्षा स्त्रिया जास्त निरक्षर आढळतात.

निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टिने आणि सरकारच्या "घराघरा पर्यन्त ज्ञानाची गंगा" या धोरणामुळे प्रत्येक गावी प्राथमिक शिक्षणाची सोय झालेली आहे. इ.स. १९८९-९० मध्ये औसा तालुक्यात १४२ प्राथमिक शाळा, ६ माध्यमिक शाळा, १७ प्राथमिक केंद्रीय शाळा, १७ खाजगी खाजगी माध्यमिक शाळा, ४ माध्यमिक शाळा आहेत. एक खाजगी संस्थेचे महाविद्यालय व दोन कनिष्ट महाविद्यालय, तंत्र निकेतन, इत्यादी कोर्स येथे सुरु आहेत.

प्रौढ शिक्षण विभाग, जिल्हा लातूर, यांच्या वतीने इ.स. १९९० ते इ.स. १९९१ पर्यन्त औसा तालुका पूर्ण साक्षर करण्याचे आयोजिले आहे.

औसा तालुक्यात केंद्र शासनाच्या वतीने १९८६ मध्ये जवळगा, पोमादेवी येथील शिक्षण संस्थेने प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविले. श्री. कुमारस्वामी महाविद्यालय याचे १०, वर्ग दयानंद वाणिज्य महाविद्यालय लातूर, श्री. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लतूर प्रत्येकी एक प्रौढ शिक्षण वर्ग या तालुक्यात १९८८-८९ पर्यन्त चालविले जात होते. सध्या तर जिल्हा प्रौढ शिक्षण विभाग, जिल्हा लातूर, या तर्फे १९९१ पर्यन्त औसा तालुका पूर्ण साक्षर करण्याचा संकल्प केलेला आहे. या बदलत्या संकल्पनांचा अभ्यास करणे अभ्यासकाला आवश्यक वाटते.

संदर्भ सूची :-


१) माहिती आणि प्रसिध्दी कार्यालय, जिल्हा लातूर.

२) TOWN DIRECTORY 1988 : Town Planning and Valuation Dept. M.S. URBAN RESEARCH CELL PUNE Vol. XXV Page VII

३) कित्ता

४) कित्ता

५) दैनिक राजधर्म- १६ ऑगस्ट १९८२ विशेष अंक.,

६) कित्ता

७) कित्ता

८) खरे ग.ह. दक्षिण मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंडा २ रा पृष्ठ क्रमांक १२३

९) पगडी सेतु माधवराव- इतिहासाचा मागोवा पृष्ट क्रमांक १३३.

१०) श्री. शोटे एस्.एस्. २६ जाने १९७३ औसा दर्शन हस्त लिखीत.

११) जिल्हा सांख्यकी कार्यालय, लातूर.

१२) उस्मानाबाद जनगनना अहवाल हस्त पुस्तिका १९५१, १९६१, १९७१, १९८१.

१३) उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका १९६६, १९७१, १९८१

१४) उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका

१५) औसा/ उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका १९५१.

१६) TOWN DIRECTORY 1988 - Town Planning and Valuation Dept. M.S. URBAN RESEARCH CELL PUNE Vol XXV Page VII

१७) कित्ता.

१८) शर्मा राघवेंद्र भीमराव २१-११-१९२४ हैद्राबाद व देशी संस्थाने वैदिक आश्रम पुणे.

हैद्राबाद राज्य वर्णन भाग ३ रा पृष्ट क्रमांक १९.

१९) कित्ता पृष्ठ क्रमांक २४.

२०) कित्ता पृष्ठ क्रमांक २५.

२१) कित्ता पृष्ठ क्रमांक २५.

२२) उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका १९६६, १९७३, पृष्ट क्रमांक ६१, ६२

२३) उस्मानाबाद जिल्हा जनगनना अहवाल हस्त पुस्तिका १९६६, १९७३, १९८१.

पृष्ट क्रमांक ६१, ६२.